नमस्कार,

सर्वप्रथम तालयोगी आश्रमाचा तपपूर्ती सोहळा यासाठी माझ्या भावना मांडायला मिळाल्या बद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. तालयोगी पंडित सुरेश तळवलकर (गुरुजी) यांच्या आशीर्वादाने आपल्याशी संवाद साधते. भारतीय संस्कृतीत तपपूर्तीला फार महत्व आहे व आपल्या आश्रमाच्या तपपूर्तीच्या प्रवासात पूज्य गुरुजींनी घेतलेले परिश्रम, ध्यास याचे आपण सर्वजण भाग्यवान साक्षीदार आहोत. २०१२ च्या २५ जूनला मी आश्रमात प्रथम प्रवेश केला. येण्याआधी गुरुजींना फोन करून 'मी आपल्याकडे शिकायला येऊ शकते का' असे विचारल्यावर 'प्रथम तुला ऐकेन मग ठरवेन' असे स्वच्छ उत्तर पलीकडून मिळाले. या पहिल्या उत्तरातच इथल्या वेगळेपणाचा मला अंदाज आला. पहिल्या दिवशी 'तकदिमी' व 'तकीट' हे बोल पायातून काढायला सांगितले व ५व्या मिनिटाला म्हणाले 'वही दे' आणि वहीत धडाधड १० पलटे स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून दिले. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. इतका निर्व्याज, निखळ, सहज आणि भीतीचा लवलेशही नसलेला विद्यादानाचा अनुभव मी प्रथमच घेत होते. एकही अवास्तव, विषयाला सोडून व मला अस्वस्थ करणारा प्रश्न त्यांनी मला विचारला नाही आणि माझी खात्री पटली की मी एका भव्य, कणखर, उदार आणि शीतल छायेत येऊन पोचले आहे.

ज्या ज्या वेळी मी आश्रमात येते त्यावेळी विद्येच्या दालनात भर पडतेच परंतु एका चांगल्या नव्या अनुभवाचीही भर पडते. आश्रम म्हणजे स्वच्छ नीटनेटकं आवार, उदबत्त्यांचा मंद सुवास, तानपुऱ्याची एक स्थिर साथ, अनेक वाद्यांची

मांदियाळी, एका भिंतीवर गुरुजींच्या गुरुजनांच्या तसबिरी व त्यांचे आश्वासक अधिष्ठान, तरुण शिष्यवर्गाचा ऊर्जात्मक वावर, जमिनीपासून उंच असा एक मंच व त्यावर मध्यभागी विराजमान झालेले आपले गुरुजी. हे वातावरण प्रथम दर्शनीच मनाला प्रसन्न करते. कुठल्याही विद्यार्थ्याला, शिष्याला, साधकाला, या वातावरणाची भुरळ न पडली तरच नवल. कुठलाही विद्यार्थी मग तो आश्रमात राहणारा असो वा बाहेरचा असो तो आश्रमाचाच होऊन जातो. गुरुजी त्याचे पालकत्व घेतात. जातीने त्याचा रियाज, अभ्यास, शिक्षण, अडचणी याकडे लक्ष देतात. त्याचा पूर्णवेळ हा कलेच्या ज्ञानार्जनातच व्यतीत होईल व त्याला जास्तीत जास्त गुरूसहवास मिळेल याकडे गुरुजींचा कटाक्ष असतो. दर वर्षी प्रत्येकाला त्याच्यातील कलागुणांचे सादरीकरण करायला मिळावे यासाठी आश्रम आणि स्वतः गुरुजी प्रयत्नशील असतात. त्यासाठी त्याचं वादन बसवून घेणं, त्याची तालीम घेणं, त्याला इतर कलांची ओळख करून देणं असा सर्वांगीण विकास शिष्याचा होत असतो व त्याच्या पालकांनाही वेळोवेळी त्यांच्या प्रगतीची साक्ष पटते.

गुरुजींचा लयतालाच्या मागचा विचार, प्रत्येक बोलाचं उच्चारण, त्याचा विकास आणि त्या साहित्यातील विचार प्रत्येकाला कळलाच पाहिजे हा त्यांचा आग्रह असतो. १५ - २० मुले एकत्र वाजवत असतील किंवा मुली नाचत असतील तरी कोण किती पाण्यात आहे हे स्पष्टपणे त्यांना कळतं व लगेच त्याचा छडा ते लावतात. एखादा विद्यार्थी चुकला की ते त्याला हटकतातच परंतु बरोबर जरी असला तरी त्यामागील खऱ्या खोट्या विचाराचा ते उहापोह करतात. चूक

केलेला एकही क्षण ते निसटू देत नाहीत. कारण एकदा ती वेळ गेली की पुन्हा येत नसल्याने बरोबर त्याच क्षणाला चिमटीत पकडल्यामुळे गुरुजींचं श्रेष्ठत्व जाणवतं. आश्रमातील प्रत्येक शिष्यच्या मनातील अमूर्त गोष्टींचं गुरुजी जे मूल्यमापन करतात ते विलक्षण आहे. मला आठवतं, एकदा माझा पदंन्यास घेत असताना गुरुजींच्या मनास ते काही येत नव्हतं. वरकरणी सगळे बरोबरच चाललंय असं मला वाटत असताना त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून माझं मन अस्वस्थ होत होतं. शेवटी न राहून मी त्यांना विचारले "काय होतंय माझं? कुठे चुकतंय का? लयीत होत नाहीये का गुरुजी?" म्हणाले, "होतंय ना अगं, पण त्या लयींशी प्रामाणिक नाहीयेस तू." मी अवाक झाले! काय हा सखोल विचार! त्यांना काय सतत या प्रवाहात जाणवत असतं याचा अंदाजही आपण पामर लावू शकत नाही. त्यांचा हा अनुभव प्रत्येकालाच येत असणार. खरं सांगू तरुण शिष्य मंडळी त्यांच्यासमोर वादनाला बसतात. उसळी मरून आनंदाच्या डोहात भिजलेले गुरुजी त्यांना काही शिकवत असतात, मध्येच गात असतात हे चालू असताना कधी भूतकाळात जातात त्यांचं त्यांनाच काळात नाही. आपण भारावल्यासारखे होत असतानाच खाटकन लयीचं भान सांगतात. या सर्व प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या अंगात, मेंदूत, मनात प्रचंड ऊर्जा पेरली जात असते व चेकाळल्यासारखी मुलं आपापल्या वाद्याला भिडतात. हे संपूर्ण दृश्य पाहणं म्हणजे एक पर्वणीच. प्रत्येक शिष्य वादन करताना थेट गुरुजींच्या डोळ्यात एका निरागस व उत्सुक भावाने पाहत असतो त्या क्षणी त्याचं संपूर्ण जीवन गुरुजींच्या एका पसंतीच्या मानेसाठी आसुसलेलं असतं.

मला आश्रम म्हणजे एखाद्या तीर्थक्षेत्री ती गरम पाण्याची किंवा गार पाण्याची कुंड असतात तसा  वाटतो. कुणीही सद्भावाने यावं व या पाण्यात न्हाऊन जावं. सान - थोर, गरीब - श्रीमंत असा भेदभाव इथे नाही. कायम उत्साहाचं आणि नवतेचं वातावरण. शास्त्रीय संगीतातील गुरुशिष्य परंपरेची ज्योत सतत तेवत ठेवणारे तालयोगी माझ्यासारख्या कलेच्या उपासकाला किती मोलाची जागा उपलब्ध करून देतात हे फक्त आम्हीच जाणो. आपण सारे शिष्य खूप भाग्यवान आहोत की या आश्रमात आपण ज्ञान ग्रहण करत आहोत.

आश्रमाच्या तपपूर्तीत अनेक लोकांचे हातभार लागले आहेत. त्या सर्वांना, दिवसरात्र या सोहळ्यासाठी काम करणाऱ्या शिष्यांना माझा प्रेमपूर्वक नमस्कार. सरतेशेवटी 'पुनश्च हरी ॐ'. माझे गुरुजी प. पू. तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांना शतायुष्य लाभो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करते. ज्यांच्यामुळे एका विद्यार्थिनीनेच देऊ केलेल्या एका बंगल्याचा आश्रम होतो व त्या आश्रमाच्या स्थानाला महात्म्य प्राप्त होतं त्या गुरूजींना  माझा साष्टांग नमस्कार.

- सोनिया परचुरे